# जपानी पुष्परचना भाग - २२




सोनेरी अर्ध चंद्रकोरी सारखे दिसणाऱ्या आकाराचे पुष्पपात्र! नेहमीपेक्षा जरा हटके आकार आणि रंग!!

पांढरे डेझी, लाल शेवंतीची दोनच फुले आणि हिरवे ॲस्परॅगस, नेच्याची पाने .. अगदी थोड्या फुलांत झालेली छोटी नाजूक रचना.

भारताचे चांद्रयान २३ ऑगस्टला चंद्रावर पोचले. आणि त्यानंतर लगेचच मला हा सुंदर व्हाज मिळाला. सोनेरी रंगाची ही चंद्रकोर त्यातील फुलांबरोबर जणू भारताचे कौतुक करत आहे. रचना बघून आनंद साजरा होतोय असे वाटले!! भारतीय लोकांचा उर अभिमानाने भरून येईल अशी आपल्या शास्त्रज्ञांची कमाल कामगिरी, अथक मेहेनत आणि कठोर परिश्रम! त्यात महिला शास्त्रज्ञांचा महत्वाचा सहभाग!

रचना करताना हे सगळे विचार मनात येत राहिले. या रचनेच्या माध्यमातून इस्रोच्या सर्व शास्त्रज्ञांना मानाचा मुजरा!

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो पुणे शाखा
ईमेल - asdssd@gmail.com